पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम

• वर्ष १ • अंक १०८ •शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ • मूल्य ३ • पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

जे काल घडले त्याबद्दल रडण्यात वेळ घालवू नका, आज काय घडवायचे आहे याचा विचार करा.







आज आर आर सी समुहा चा २५ व्या अर्थात रौप्य महोत्सवी वर्धापन दिनसोहळ्याची सुरुवात झाली. संस्थापक संचालक प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख, सौ. कल्पना देशमुख, कार्यकारी संचालक पंकज देशमुख, सौ.ऋतुजा देशमुख, चि.आर्यमन, आदित्य देशमुख, सौ. श्रेया देशमुख, चि.समरवीर, चिन्मय देशमुख, परिक्षित देशमुख, ईशा देशमुख, राम महाजन, चिराग वखारिया, ऋषीकेश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत व आर आर सी समुहाचे सर्व कर्मचारी वृंद, ऑपरेटर, जाहिरातदार, हितचिंतक यांच्या उपस्थितीत केक कटिंग मोठ्या उत्साहात पार पडला. आर आर सी समुहाच्या वर्धापन दिनाचा भव्य सोहळा लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. वर्धापनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव आज आर आर सी समुहावर झाला.

## »थोडक्यात

### गणेशोत्सवाच्या तोंडावर एफडीएचा दणका!

पुणे : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने पुण्यातील बुधवार पेठ परिसरातून ४ ट्रक पनीर-खवा जप्त केला आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या या ॲक्शनने एकच खळबळ उडाली आहे. जप्त केलेल्या खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून, त्यांची गुणवत्ता आणि साठ्याच्या स्त्रोताबाबत तपास सुरू आहे. गणेशोत्सवात मिठाई आणि खाद्यपदार्थांची मागणी वाढत असल्याने भेसळ रोखण्यासाठी एफडीएकडून विशेष मोहीम राबवली जात आहे. या कारवाईमुळे पुण्यातील खाद्य व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### नांदेड-भोकर मार्गावर भीषण अपघातात ८ ठार, ७ जखमी

नांदेड : नांदेड-भोकर मार्गावर गुरुवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान ट्रक आणि पिकअप वाहनात समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात आठ जणांचा जागीच मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी आहेत. मृतांमध्ये पती-पत्नी आणि दोन सख्ख्या भावांचा समावेश आहे. सर्वत्र पोळा साजरा केला जात असताना भोकर तालुक्याला मात्र एका भीषण अपघाताच्या घटनेला सामोरे जावे लागले. आठ जणांच्या मृत्यूने भोकरमध्ये शोककळा पसरली आहे. सर्व जखमींना नांदेडच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### ट्रक- पिकअपच्या धडकेत आठ मजुरांचा मृत्यू!

**भंडारा :** पोळ्याच्या पाडव्याची पहाट भंडारा जिल्ह्यासाठी काळरात्र ठरली. नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर लाखनी तालुक्यातील पिंपळगाव/सडक येथे ट्रक आणि पिकअप वाहनाची भीषण धडक होऊन आठ मजुरांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर भंडारा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत आणि जखमी हे छत्तीसगडमधील मजूर असल्याची माहिती आहे. लाखनी तालुक्यातील साकोली लाखनी राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगावजवळील भाऊ ढाब्याच्या परिसरात आज पहाटे हा अपघात झाला.

# खबरदार... हात लावाल तर महाराष्ट्र येथे येईल!

## सरकारला ओपन चॅलेंज, जरांगेंच्या मदतीला अभिजित दिपके धावले

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

जालना : हा महाराष्ट्र आहे मनोज सरांना हात लावला तर महाराष्ट्र इथं येईल, असा खणखणीत इशारा कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके यांनी आज (शुक्रवारी) सरकारला दिला. आंतरवाली सराटीत त्यांनी जरांगे पाटील यांच्या उपोषणस्थळाला भेट दिली. दिपके यांच्या या वक्तव्याने आता आंदोलनाला अधिक धार येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ते पुढे म्हणाले, हे सरकार इतकं निर्दयी आहे की त्यांना काही फरक पडत नाही. एक माणूस इथं उपोषणाला बसला



आहे, तो स्वतःसाठी उपोषणाला बसलेला नाही. समाजातील मुलांना चांगलं शिक्षण मिळावं. रोजगार भेटावा, यासाठी ते उपोषणाला बसलेले आहेत. तुम्ही जर मुलांना चांगलं शिक्षण दिलं असतं, रोजगार दिला असता तर यांना काय गरज पडली असती उपोषणाला बसायची? असा थेट सवाल सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सरकारला विचारला.

### हे सरकारचे अपयश!

हे सरकारचं अपयश आहे. तुम्हाला ज्या गोष्टीसाठी निवडून देण्यात आलं होतं. लोकांची जी कामं करून देण्यासाठी निवडून देण्यात आलं होतं. ते तुम्ही केलेलं नाही. लोकांना तुम्ही वाऱ्यावर सोडलं आहे. काल प्रथमेश देशमुख यांच्या घरी मी गेलो होतो. २७ वर्षांचा मुलगा अडीच लाखांच्या उधारीसाठी आत्महत्या करतो. या मुलांनी आत्महत्या करू नयेत. त्यांना सवलती मिळाव्यात. त्यांना रोजगार मिळावे यासाठी जरांगे पाटील हे उपोषणाला बसलेले आहेत ना. मग ज्यांना आपण निवडून दिले, ते मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री काय करत आहेत.

### जांब वसू येथे वाहनाच्या धडकेत महिला ठार

**बार्शिटाकळी :** पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या जांब वसु येथे आज थरारक घटना घडली. एक वाहन घरावर सारख्या धडका देत होते. यामुळे एक महिला जखमी होऊन मरण पावली अशी माहिती आहे. तसेच वाहन चालक देखील जखमी झाला.

तेथे उभ्या असणाऱ्या काही जणांनी वाहनावर दगडफेक करून संताप व्यक्त केला. जखमी महिलेला रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचार दरम्यान ती मरण पावली. या घटने मागील सत्य उघड व्हावे अशी मागणी आहे.

# मुंबई शेअर बाजारात ‘ब्लॅक फ्रायडे’!

## गुंतवणूकदारांचे 6 लाख कोटी बुडाले, सेन्सेक्स-निफ्टी कोसळले

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**मुंबई :** जागतिक बाजारातील नकारात्मक संकेतांमुळे शुक्रवारी सकाळच्या सत्रात भारतीय शेअर बाजाराच्या प्रमुख निर्देशांकांमध्ये मोठी घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. बाजार उघडला तेव्हा सेन्सेक्स ७४० अंशांनी घसरून ७४,१६० वर आला होता, तर एनएसईचा निफ्टी ५० निर्देशांक सुमारे २५० अंशांनी घसरून २३,२३१ या दिवसातील नीचांकी पातळीवर पोहोचला होता. बाजारातील ही घसरण जवळपास सर्वच निर्देशांकामध्ये पाहायला मिळाली. कारण बीएसई १५० मिडकॅप आणि २५० स्मॉलकॅप निर्देशांकांमध्येही १.५ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. बाजारातील व्यवहारांच्या पहिल्या पाच मिनिटांतच बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे



एकूण बाजार भांडवल (मार्केट कॅपिटलायझेशन) मागील सत्रातील सुमारे ४८४ लाख कोटी रुपयांवरून घसरून ४७८ लाख कोटी रुपयांच्या आसपास आल्याने गुंतवणूकदारांचे सुमारे ६ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. यानंतर सकाळी १०:३० च्या सुमारास बीएसई सेन्सेक्स आणि निफ्टी ५० मोठ्या प्रमाणावर सावरल्याचे पाहायला मिळाले. यावेळी सेन्सेक्स ५४८.६९ अंशांच्या घसरणीसह ७४,३५३.९१ अंशांवर व्यवहार करत होता. तर, निफ्टी ५० निर्देशांक १८३.२० अंशांच्या घसरणीसह २३,२९२.६० वर व्यवहार करत होता.

### अमेरिकन बाँड यील्ड ५ टक्क्यांच्या जवळ

अमेरिकन ट्रेझरी यील्डमधील तीव्र वाढीमुळे गुंतवणूकदारांमध्ये व्याजदरांविषयी चिंता वाढत आहे. अमेरिकेच्या उत्पादक-किंमतीच्या आकडेवारीमुळे महागाई स्थिर राहण्याची शक्यता वाढल्याने, अमेरिकेचा १०-वर्षीय ट्रेझरी यील्ड जवळपास ५ टक्क्यांपर्यंत वाढला, जो गेल्या तीन वर्षांतील सर्वोच्च स्तर आहे. भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांसाठी अधिक महत्त्वाचे म्हणजे, अमेरिकेतील व्याजदर दीर्घकाळासाठी उच्च राहण्याच्या शक्यतेमुळे जागतिक गुंतवणूकदारांना अमेरिकन निश्चित-उत्पन्न मालमत्तेकडे पैसे वळवण्यासाठी प्रोत्साहन मिळू शकते.

### तीन पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला :** अकोला जिल्हा पोलीस दलात प्रशासकीय कारणास्तव फेरबदल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार जिल्ह्यातील तीन पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. मनोज केदारे यांच्याकडून खदान पोलीस स्टेशनचा कार्यभार काढून त्यांना नियंत्रण कक्षेत पाठविले आहे. तर खदान पोलिस स्टेशनमध्ये भाऊराव घुगे यांची ठाणेदारपदी नियुक्ती केली आहे. पोलीस नियंत्रण कक्षातून अकोला शहर वाहतूक शाखेत विलास पाटील यांची बदली केली आहे. बदली झालेल्या सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ आपल्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त होऊन नवीन नियुक्तीच्या ठिकाणी पदभार स्वीकारावा व त्याचा पूर्तता अहवाल सादर करावा, असे निर्देश आदेशात देण्यात आले आहेत.

# शाडूच्या मातीत साकारले श्रद्धेचे सूर

## आराध्याची 'विणाधारी गणेशमूर्ती' ठरतेय प्रेरणेचा स्रोत

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला :** जेव्हा जिद्द आणि कलेची ओढ अथांग असते, तेव्हा शरीराच्या कोणत्याही मर्यादा आड येऊ शकत नाहीत, याचा जिवंत प्रत्यय अकोला येथील समर्थ स्कूलची विद्यार्थिनी आराध्या हिने आणून दिला आहे. हाताची पूर्ण वाढ झालेली नसतानाही आराध्याने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शाडूच्या मातीपासून अत्यंत सुबक 'विणाधारी गणेशमूर्ती' साकारली असून, तिची ही अद्भुत कलाकृती पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले आहेत.

आराध्याच्या हाताची पूर्ण वाढ झालेली नसणे इतरांच्या दृष्टीने शारीरिक उणीव किंवा अडचण वाटू शकते; परंतु तिने या मर्यादेला आपल्या स्वप्नांच्या व कलेच्या आड कधीही येऊ दिले नाही. गणेशोत्सवाच्या या पवित्र



काळात इको-फ्रेंडली संदेश देत तिने स्वतःच्या हातांनी गणेशमूर्ती घडवण्याचा ध्यास घेतला.

ओल्या मातीला आकार देताना आणि चित्रकलेचा ब्रश हातात धरताना आराध्याची एकाग्रता व कौशल्य वाखाणण्याजोगे होते. तिने साकारलेली गणेशमूर्ती अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामान्यतः सरस्वती देवीच्या हातात असलेली वीणा आराध्याने बाप्पाच्या हातात अतिशय सुबकतेने टेकवली आहे. ज्ञान आणि कलेची देवता असलेली वीणा जेव्हा विघ्नहर्त्याच्या हातात विराजमान झाली, तेव्हा त्या मूर्तीतून केवळ कलाच नाही, तर एक सुरेल आणि सकारात्मक ऊर्जा वाहू लागल्याचा अनुभव उपस्थितांनी घेतला.

आराध्याने घडवलेला हा 'विणाधारी गणेश' केवळ मातीची मूर्ती नसून संकटांवर मात करून पुढे जाण्याच्या जिद्दीचे प्रतीक ठरला आहे. कला आणि भक्तीला कोणत्याही अवयवांच्या पूर्णतेची नाही, तर कणखर मनाची गरज असते हेच आराध्याच्या आत्मविश्वासाने सिद्ध केले आहे. तिच्या या कलाकृतीने आज हजारो नागरिकांना व विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आहे.

# आजपासून‘ब्रिक्स’ शिखर परिषदेला प्रारंभ

## सात वर्षांनंतर जिनपिंग भारतात येणार; पुतिन यांचीही उपस्थिती

वृत्तसंस्था ११ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** दिल्लीतील ‘भारत मंडपम’ येथे आज, शुक्रवारपासून तीन दिवस होणाऱ्या १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या व्यासपीठावरून संवाद, सहकार्य आणि विश्वशांतीचा संदेश जगाला देण्याची तयारी भारताने केली आहे. मुख्यतः रविवारी होणारी यंदाची दिल्ली ब्रिक्स परिषद विशेष महत्त्वाची ठरणार आहे. चीनचे अध्यक्ष शि जिनपिंग तब्बल सात वर्षांनंतर भारतात येत असून रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन व इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्यासह प्रमुख जागतिक नेत्यांची उपस्थिती या परिषदेला मोठे राजनैतिक वजन देणार आहे.

जगाच्या विविध भागांत युद्धे पेटली असताना व्यापार संघर्ष आणि मुख्यतः अमेरिका व काही युरोपीय देश पुरस्कृत शुल्क संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर अनिश्चिततेचे सावट असताना होणारी ही शिखर परिषद वर्तमान जागतिक परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ‘ब्रिक्स’ देशांसमोर केवळ आर्थिक सहकार्याचे आव्हान नाही. पश्चिम आशियातील युद्धस्थितीने ‘ब्रिक्स’मध्येच मतभेद निर्माण केले आहेत.

अशा परिस्थितीत भारतासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन शांतता आणि संवादाचा समान सूर निर्माण करणे ही यजमान म्हणून भारतासाठीही मोठी राजनैतिक कसोटी असेल. यंदाच्या परिषदेत युद्ध आणि संघर्षांच्या पार्श्वभूमीवर जागतिक व्यवस्थेला अधिक स्थैर्य देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भारताच्या अध्यक्षपदाची संकल्पना ‘लवचिकता, नावीन्य (नवनिर्मिती), सहकार्य आणि शाश्वततेसाठी निर्माण करणे’ अशी आहे. अन्न व ऊर्जा सुरक्षा, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन, महत्त्वाच्या पुरवठा साखळ्या, व्यापार, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान या मुद्द्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.



### मोदींशी जिनपिंग,पुतीन यांची स्वतंत्र चर्चेची शक्यता

या पार्श्वभूमीवर शी जिनपिंग यांचा सात वर्षांनंतरचा भारत दौरा विशेष लक्षवेधी ठरतो. सन २०१९ नंतर प्रथमच भारतात येणाऱ्या जिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात स्वतंत्र द्विपक्षीय चर्चा होण्याची शक्यता आहे. ‘ब्रिक्स’च्या व्यापक चौकटीत आर्थिक आणि व्यापारी सहकार्याबरोबरच द्विपक्षीय संबंधांतील संवेदनशील मुद्द्यांवरही चर्चा होऊ शकते. पुतिन उद्या, शनिवारीच दिल्लीत पोहोचणार असून, त्यांची पंतप्रधान मोदी यांच्याशी स्वतंत्र भेट होणार आहे. व्यापार, गुंतवणूक, संरक्षण आणि आर्थिक सहकार्याबरोबरच युक्रेन युद्ध आणि शांततामय तोडग्याच्या प्रयत्नांवरही चर्चा अपेक्षित आहे.

### तारिक रेहमानची गैरहजेरी

चीन आणि भारताच्या संबंधात सुधारणा होत असतानाच बांगलादेशाचे पंतप्रधान तारिक रेहमान यांनी मात्र आपण 'ब्रिक्स' परिषदेसाठी भारतात जाणार नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे त्या देशाशी संबंध सुरळीत करण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागण्याची चिन्हे आहेत. बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना भारताने आश्रय दिल्यामुळे दोन्ही देशांत काहीसा तणाव आहे.



# जिल्ह्यात कार वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटमधील पाण्याची नासाडी थांबवण्याची मागणी

प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**अकोला :** गेल्या ४५ दिवसांपासून पावसाने दांडी मारल्यामुळे शहरावर दुष्काळाचे सावट पसरले आहे. असे असतानाही शहरात अनेक कार वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटमध्ये पाण्याची प्रचंड नासाडी सुरू आहे. शहरात तब्बल ८ दिवसांआड नळाला पाणी सोडले जात आहे. दुसरीकडे, कार वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटधारकांकडून दररोज लाखो लिटर भूजलाचा उपसा केला जात आहे. या गंभीर प्रकाराकडे महापालिका प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे.

अल निनोच्या प्रभावामुळे यंदा अत्यंत कमी पाऊस झाला आहे. गेल्या ४५ दिवसांपासून पाऊस न पडल्यामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महान धरणात केवळ २३% जलसाठा उरला आहे. येत्या काळात पाऊस झाला नाही, तर महान धरणातील पाणीपातळी आणखी खाली जाण्याची भीती आहे. निर्माण झालेले पाण्याचे संकट पाहता महान धरणातील पाणी अकोला शहरासाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून आणि धरणातून पाणी उपसा करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. शहरात बसवण्यात आलेले शेकडो



बोअरवेल आणि हायड्रंट बंद पडले आहेत. अकोलेकरांना ८ दिवसांनंतर पाणी मिळत असून संपूर्ण शहर भीषण पाणीटंचाईचा सामना करत आहे. दुसरीकडे, शहराच्या गल्लीबोळात असलेल्या कार वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटमध्ये दररोज हजारो लिटर भूजलाचा उपसा सुरू आहे. रात्रंदिवस मोटार पंपांच्या साहाय्याने जमिनीतून पाणी बाहेर काढले जात आहे. गाड्या धुतल्यानंतर हे सर्व पाणी थेट नाल्यांमध्ये वाहून जाते. पाणी वाचवण्यासाठी एकाही कार वॉशिंग सेंटर किंवा अॅक्वा वॉटर प्लांटमध्ये जलपुनर्भरण (रेनवॉटर हार्वेस्टिंग) ची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. मोफत मिळणाऱ्या या पाण्यावर कार वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटचालक दररोज हजारो रुपयांची कमाई करत आहेत. याउलट, महापालिकेला या मोजक्याच कार वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटचालकांकडून नाममात्र महसूल मिळतो. पाणी वाचवणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे, हे लक्षात घेऊन पाण्याचा बेसुमार उपसा करणाऱ्या या वॉशिंग सेंटर आणि अॅक्वा वॉटर प्लांटचालकांवर महापालिका प्रशासनाने कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिक करत आहेत.

दरम्यान, महापालिकेने अद्याप शहरातील नागरिकांना पाणीटंचाईतून दिलासा देण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा उभी केलेली नाही; फक्त कागदावरच उपाययोजना आखल्या जात आहेत, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक निलेश देव यांनी केला आहे.

# हिवरखेड आयुष्मान आरोग्य केंद्राला विंचू काट्याचा विळखा!

**हिवरखेड :** हिवरखेड येथील आयुष्मान आरोग्यकेंद्राच्या परिसरात विंचू काट्याने विळखा लावला असून यामध्ये विषारी प्राणी आसरा घेत असल्याचे रुग्णांच्या बोलण्यावरून समजते तसेच डांस, मच्छरवाढल्याने रुग्ण व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

परिसरातील अस्वच्छता, वाढलेले गवत व झुडपांकडे मात्र याकडे संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याचा आरोप होत आहे.

आरोग्यकेंद्राच्या परिसरात विषारी प्राण्यांच्या वावर होत



असताना प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच या दोन्ही तिन्ही उपकेंद्रात काही लाभार्थी आपल्या चिमुकल्यांना. लसीकरणाला , शिबिराला, पोलिओ करिता तसेच गर्भवती उपचार घेण्यासाठी जातात त्यांना या मोठ मोठ्या झुडुपातून येणे जाणे करावे लागत आहे ,ही 4सुद्धा गंभीर बाब असून याकडे वरिष्ठांचे सुद्धा दुर्लक्ष होत आहे, तातडीने स्वच्छता व फवारणी करून या प्राथमिक आरोग्य केंद्राला व अंगणवाडी जवळून ओ पी टी केंद्राला सुद्धा या विषारी विळख्या पासून मुक्त करा अन्यथा मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण? असा सवालही नागरिकांनी केला आहे,

## श्री क्षेत्र श्रद्धा सागर येथे श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव संपन्न

**अकोट :** श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रध्दा सागर, आकोट द्वारा घेण्यात आला. यामध्ये वारकरी संप्रदाया मधील महान संत श्री सेना महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे विविध कार्यक्रमांनी ०८ रोजी झाला.

यानिमित्ताने पहाटे श्रींचा अभिषेक होऊन सकाळी स्वानंद सुखनिवासी सद्गुरु श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील उपशाखा श्री संत वासुदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर आकोटच्या सर्व विद्यार्थ्यांनी सकाळी विधिवत गाथा भजन केले. यामध्ये विविध संतांसह श्री संत सेना महाराजांच्या अभंगाचे सुद्धा भजन करण्यात आले.

यानंतर पूजन सोहळा व आरती संपन्न झाली. तदनंतर बालवैष्णवांसह उपस्थित भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रस्तुत कार्यक्रमाकरिता संस्थेचे पुरुषोत्तम लाजूरकर, व्यवस्थापक अमोल मानकर, दिलीप कुलट, वा.शि.सं. अध्यापक राम म.गाढे, त्याचप्रमाणे बाळकृष्ण वाकोडे व वारकरी शिक्षण संस्थेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## वरुळ शिवारात अज्ञात व्यक्तीने शेतातील पराटी उपटली



**अडगाव :** येथील शेतकरी आहद खान जमीर खान राहणार अडगाव बु!यांचे वरुड शिवारात स्वता:चे सातबारा मालकीच्या शेतात गट क्र15/अ/1क 282 या शेतातील अज्ञात व्यक्तीने उभी पराटी ऊपटवुन शेतातच फेकुन दिली.तसेच शेजारी असलेले शेतकरी इरशाद खान यांचे शेतातील पराटी उपटुन त्यांचे सुद्धा फार मोठे नुकसान झाले. यावर पोलीस स्टेशन हिवखेड येथे अज्ञात व्यक्ती विरुद्ध कारवाइ व्हावी अशा आसयाचा रिपोर्ट देण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

## खासगी रुग्णालयातील गरीब रुग्णांनाही 108 रुग्णवाहिका मोफत द्या

प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**शेख इमरान यांची मागणी**



**मुर्तीजापूर :** आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांना वेळेत रुग्णालयात पोहोचविता यावे, यासाठी शासनाच्या वतीने १०८ रुग्णवाहिका सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात हलविताना १०८ रुग्णवाहिका सेवेचा मोफत लाभ मिळत नसल्याची बाब समोर येत आहे. याकडे शेख इमरान शेख खलील यांनी लक्ष वेधले आहे.

शासकीय रुग्णालयातील रुग्णांना आपत्कालीन परिस्थितीत १०८ रुग्णवाहिका उपलब्ध होत असताना, खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी मात्र ही सुविधा उपलब्ध नसल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. अनेक गरीब रुग्ण विविध शासकीय आरोग्य योजनांच्या माध्यमातून खासगी रुग्णालयात उपचार घेत असतात. अशा रुग्णांची प्रकृती खालावल्यास किंवा अधिक चांगल्या उपचारांसाठी त्यांना दुसऱ्या रुग्णालयात हलविण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास रुग्णवाहिकेचा खर्च करणे त्यांच्या कुटुंबासाठी मोठे आव्हान ठरते.

विशेषतः गंभीर आजार, अपघात किंवा अत्यवस्थ स्थितीतील रुग्णांना तातडीने पुढील उपचारासाठी हलविणे आवश्यक असते. अशा वेळी रुग्णवाहिका उपलब्ध होण्यास विलंब होणे किंवा आर्थिक अडचणीमुळे रुग्णवाहिका घेता न येणे, ही बाब रुग्णाच्या जीवितासाठीही धोकादायक ठरू शकते. 'गरीब रुग्ण कोणत्या रुग्णालयात उपचार घेतो, यावर त्याला मिळणारी आपत्कालीन सुविधा अवलंबून असू नये,' अशी भूमिका सामाजिक कार्यकर्ते शेख इमरान शेख खलील यांनी मांडली आहे. शासनाने १०८ रुग्णवाहिका सेवेच्या नियमांमध्ये आवश्यक बदल करून शासकीय आरोग्य योजनांचा लाभ घेणाऱ्या पात्र गरीब व गरजू रुग्णांना खासगी रुग्णालयातून पुढील उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात हलवितानाही ही सेवा मोफत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी शासन दरबारी केली आहे.

## अकोट येथे संत सेना महाराज पुण्यतिथी महोत्सव : विठ्ठल रुक्मिणी संत सेना महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**अकोट :** येथील संत सेना महाराज शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था व नाभिक समाजाच्या वतीने पुण्यतिथी महोत्सव 5 सप्टेंबर ते 8 सप्टेंबर पर्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विधिवत पूजाअर्चा व विठ्ठल रुक्मिणी संत सेना महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा यज्ञ विधी, भजन कीर्तन करून स्थापन करण्यात आली. शिवाजीनगर येथून श्री चा अभिषेक करून भव्य शोभायात्रा शहरातून काढण्यात आली.



महोत्सवात नाभिक समाज बांधवांचा मेळावा संस्थेचे अध्यक्ष संजय भायाणी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी मधुकरराव सूर्यवंशी, दैनिक एकमतचे सोलापूर आवृत्ती प्रमुख संजय येऊलकर, सेवानिवृत्त अभियंता अनंतराव अमृतकर, डॉ गजाननराव महाले, नाभिक समाज महिला मंडळ अध्यक्ष मीना अंबुलकर, सलून दुकान संघटनेचे अध्यक्ष संतोष चोंडेकर यांच्या उपस्थिती संपन्न झाला. याप्रसंगी मूर्ती दाता सौ. रत्नप्रभा अनंतराव अमृतकर, भारत भूषण पुरस्कार प्राप्त अशोकराव उंबरकर, कृतिशील शिक्षक ज्ञानेश्वर खापरकर, सेवानिवृत्त अभियंता राजेश येवुलकर, सेवानिवृत्त तंत्रज्ञ अनिल येऊलकर, पोलीस विभागात पदोन्नती प्राप्त अनिल लापूरकर, रवींद्र अठराळे इतर विभागात नोकरी करिता निवड झालेले सुरज डांगटे, स्वप्निल मानकर, रितेश मोरस्कर, पंकज अंबुलकर, सेवानिवृत्त तलाठी अरुणराव उकळकर, गजानन कळसकर, प्रा सुभाष शिवरामे हरिदास धानोरकर यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला महाराष्ट्र नाभिक साहित्य दर्पणचे अध्यक्ष मुकुंद धजेकर, श्रीराम अठराळे, राजेंद्र भातुलकर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सभागृहात स्व. तात्यासाहेब शिंगणारे यांच्या फोटोचे अनावरण करण्यात आले व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्याकमाचे संचालन राजेश डांगटे, रूपाली आगासे यांनी केले. प्रास्ताविक नरेंद्र महानकर यांनी व आभार नंदकिशोर शिराळकर यांनी केले कार्यक्रमाला नाभिक समाज बांधव यांची उपस्थिती होती.

## देऊळगाव ग्रामपंचायतीतील मासिक सभांवर प्रश्नचिन्ह

**खोटे ठराव व बनावट दस्तऐवजांच्या आरोपांची चौकशी रखडली**

**पातूर :** ग्रामपंचायत येथे सन 2023-24 व 2024-25 या कालावधीत नियमित मासिक सभा न घेता परस्पर खोटे ठराव तयार करून शासनाच्या निधीचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत प्रशासनावर करण्यात आला आहे. याप्रकरणी ग्रामपंचायत प्रशासक सदस्य शंकर शिवहरी बदरखे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती पातूर तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करून चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, ग्रामपंच अधिनियम 1961 नुसार घेण्यात येणाऱ्या मासिक सभा प्रत्यक्षात झाल्या नसतानाही सभांचे रजिस्टर व ठराव तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायत सदस्यांच्या खोट्या सह्या करून प्रोसिडिंग बुक तयार करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या दस्तऐवजांच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यांना मासिक सभा झाल्याचे भासवून शासनाची व ग्रामस्थांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

दरम्यान, पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत कार्यालयाचे अभिलेख तपासून असा निष्कर्ष दिला आहे की मासिक सभा घेण्यात आलेल्या नाहीत

> सन 23 24 24 25 या वर्षामध्ये मासिक सभा घेतल्या नाहीत त्याची चौकशी गटविकास अधिकारी यांनी केली त्यामध्ये मासिक सभा न झाल्याचे दिसून आले मात्र सचिव यांनी खोटे दस्ताऐवज तयार केले त्यामध्ये जवळपास 40 लाखचा अपार केल्याचा गट विकास अधिकारी यांच्या तपासणी नुसार स्पष्ट होते ग्रामपंचायत प्रशासक सदस्य शंकर शिवहरी बदरखे
> देऊळगाव.

आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, त्यानंतरही या प्रकरणाची सखोल चौकशी व पुढील कारवाई अद्याप झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणात लाखो रुपयांचा शासकीय निधी संबंधित कामांसाठी काढण्यात आल्याचा आरोप असून, प्रत्यक्ष कामे, ठराव व निधी खर्च यांची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. बनावट दस्तऐवज व खोट्या सह्यांबाबत तक्रारदाराने पातूर पोलीस ठाण्यातही लेखी तक्रार दिल्याचे समोर आले आहे. चौकशी अहवालातच मासिक सभा न झाल्याचे स्पष्ट झाले असल्यास संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# भूदान चळवळीचे प्रणेते अन् महात्मा गांधींचे शिष्य आचार्य विनोबा भावे!

विनायक नरहर भावे हे विनोबा भावे नावाने लोकप्रिय आहेत. हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी १९४० मध्ये 'वैयक्तिक सत्याग्रह' पुकारला, त्यावेळी पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी भावेंची निवड केली. ब्रिटिश राजविरोधी या आंदोलनाचे पर्यवसान १९४२ मध्ये 'छोडो भारत' आंदोलनात झाले. भावे पुढे सर्वोदयी नेते म्हणून प्रसिद्ध झाले.

कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तहसिलातील गागोदे या गावी ११ सप्टेंबर १८९५ रोजी विनोबा तथा विनायक नरहर भावे यांचा जन्म झाला. आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुराव भावे यांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायणतेचे संस्कार विनोबांना मिळाले. त्यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रखुमाबाई. वडील नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले; परंतु वाटेतच सुरतेस उतरून आईवडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले.

त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक, वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या.ड संदर्भ हवा त्यांनी महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला व गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजी भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहश्रमात नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षांची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता.

भावे हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधींसोबत होते. स्वातंत्र्य लढ्यातील सहभागाबद्दल सन १९३२ मध्ये त्यांना तुरुंगवास घडला. वाई येथील प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संस्थापक व मुख्याध्यापक स्वामी केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांच्यापाशी विनोबांनी उपनिषदे, ब्रह्मसूत्र शांकरभाष्य, पांतजलयोगसूत्रे इ. विषयांचे अध्ययन केले.

माहुली येथील स्वामी कृष्णानंद यांच्या आश्रमातील काही प्रौढ विद्यार्थी-शिवनामे, वि.का. सहस्रबुद्धे इत्यादी मंडळीही त्यांच्याबरोबर सहाध्यायी होती. दिनकरशास्त्री कानडे व महादेवशास्त्री दिवेकर हे प्राज्ञपाठशाळेची व्यवस्थापनाची व अन्य प्रकारची कामे पाहत होते. प्रत्येक सोमवार हा या पाठशाळेचा सुटीचा म्हणजे अनध्ययनाचा दिवस असे. त्या दिवशी पाठशाळेची अंगमेहनतीची कामे शिक्षक-विद्यार्थी उरकत असत आणि प्रज्ञानंदस्वामींच्या समाधिस्थानाच्या सभागृहात विद्यार्थी व शिक्षक यांच्या शास्त्रार्थ चर्चेकरता साप्ताहिक सभा भरत. चर्चेचे विषय सामाजिक, धार्मिक, तात्त्विक हे असतच; परंतु त्याबरोबर प्रचलित राजकारणाची अनेक बाजूंनी मीमांसाही चालत असे. दिनकरशास्त्री कानडे हे सेनापती बापट, स्वातंत्र्यवीर सावरकर, योगी अरविंद घोष इत्यादी सशस्त्र क्रांतीकारकांच्या मार्गाने चालणाऱ्या एका गुप्त कटाचे सदस्य होते. सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा ते पुरस्कार करीत. विनोबांच्याप्रमाणेच त्यांचेही वक्तृत्व अमोघ होते. अहिंसक क्रांताची वैचारिक भूमिका विनोबा मोठ्या परिणामकारक रीतीने या साप्ताहिक सभांमध्ये मांडीत असत. १९१७ साली हिवाळ्यात वाई येथे प्लेगची साथ उद्भवली. कृष्णेच्या दक्षिण तीरावर राहुट्या आणि पर्णशाला उभारून त्यांत प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी व शिक्षक जवळजवळ ४ महिने राहिले. वेदान्ताचे व इतर शास्त्रांचे पाठ त्यांतील एका विस्तृत पर्णशालेमध्ये चालत असत. विनोबा प र्ण शा ले बा हे र च्या कृष्णाकाठच्या आम्रवृक्षाच्या छायेखाली उपनिषदांचे व शांकरभाष्याचे उच्च स्वरात वाचन करीत, हळूहळू सावकाश फेऱ्या मारीत असत. त्यांचे ते प्रसन्न वाचन ऐकून स्वामी केवलनंदांच्या मनावर विनोबाजींच्या व्यक्तिमत्त्वाची खूप खोल छाप पडली, विनोबांनी वेदान्ताविषयामध्ये खूप वेगाने १० महिन्यांत प्रगती केली. आपण कोणकोणत्या ग्रंथांचे व विषयांचे अध्ययन केले याचा सविस्तर वृतान्त त्यांनी महात्मा गांधींना कळवला. गांधीं हे वृत्तान्तपत्र वाचून अत्यंत विस्मित झाले. त्या पत्राच्या उत्तरात म. गांधींनी अखेर म्हणले की, ' ए गोरख, तूने मच्छिंदरको भी जीत लिया है !'



आज जयंती

विनोबा वाईहून परत अहमदाबादला फेब्रुवारी १९१८ मध्ये परतले. १९१८ साली एन्फ्ल्यूएंझाची साथ देशभर पसरली. लक्षावधी लोक त्या साथीला बळी पडले. त्यात विनोबांचे वडील, मातुश्री आणि सगळ्यात धाकटा भाऊ दत्तात्रय हे आजारी पडले. ही गोष्ट महात्मा गांधीना कळल्यावर त्यांनी विनोबांना मातुश्रींच्या शुश्रूषेकरता बडोद्यास जाण्याचा आग्रह धरला. विनोबा तयार नव्हते. गांधींनी त्यांचे मन वळवले. आई आणि धाकटा भाऊ या रोगाला बळी पडले. वडील बरे झाले. विनोबा सर्वांत ज्येष्ठ पुत्र, म्हणून आईचा अंत्यविधी त्यांनीच करणे प्राप्त होते. पुरोहिताकडून अंत्यविधीचा संस्कार करवून घेणे विनोबांना मान्य नव्हते. म्हणून ते स्मशानात गेले नाहीत. वडिलांनी पद्धतीप्रमाणे अंत्यविधी उरकून घेतला.

१९२१ साली गांधींचे भक्त शेठ जमनालाल बजाज यांनी साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमाची शाखा वर्ध्याला काढली. त्या शाखेचे संचालक म्हणून महात्मा गांधीनी विनोबांची रवानगी वर्ध्यास केली. ८ एप्रिल १९२१ रोजी विनोबा वर्ध्याला पोहोचले. आतापर्यंत संबंध आयुष्य -१९५१ ते ७३ पर्यंतची भूदानयात्रा सोडल्यास या वर्ध्याच्या आश्रमातच राहून विनोबांनी तपश्चर्या करीत जीवन घालविले. हा वर्ध्याचा आश्रम क्रमाने मगनवाडी, बजाजवाडी, महिलाश्रम, सेवाग्राम व पवनार ह्या ठिकाणी फिरत राहिला. ही सर्व ठिकाणे वर्ध्याच्या ८ किमी. परिसरातच आहेत. दिवसातले सात-आठ तास सूत कातणे, विणणे आणि शेतकाम यांमध्ये त्यांनी घालविले. रोज नेमाने शरीरश्रम प्रत्येक माणसाने करावे, असा त्यांचा सिद्धान्त होता. 'शरीरश्रमनिष्ठा' हे त्यांच्या जीवन-तत्त्वज्ञानाप्रमाणे महत्त्वाचे व्रत होते. शरीरश्रमांबरोबरच त्यांनी मानसिक, आधात्मिक साधनाही प्रखरतेने केली. १९३० व ३२ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी कारागृहवास भोगला. १९४० साली महात्मा गांधीनी स्वराज्याकरिता वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन आरंभले. त्यात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. जवाहरलाल नेहरू हे दुसरे निवडले. आध्यात्मिक साधनेला वाहून घेतलला शत्रुमित्रसमभावी तपस्वी मनुष्य सत्याग्रहाला अत्यंत आवश्यक, म्हणून त्यांनी वनीबांची निवड केली. कारण सत्याग्रह हे शत्रूच्या हृदयपरिवर्तनाचे नैतिक शुद्ध साधन होत, अशी महत्मा गांधीची मूलभूत राजकीय भूमिका होती. उच्चतम आध्यात्मिक जीवनसाधनेस वाहिलेला शत्रुमित्रभाव विसरलेला माणूसच असे हृदय-परिवर्तन करू शकतो, अशी गांधींची धारणा होती. २० ऑक्टोबर १९४० रोजी स्वसंपादित हरिजन साप्ताहिकात गांधींनी आपल्या या शिष्याची ओळख करून दिली आहे. १९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला. त्यांनी धुळे कारागृहामध्ये शिक्षा भोगली. सुप्रसिद्ध गीताप्रवचने या कारागृहात त्यांनी दिली. शंभरापेक्षा अधिक सत्याग्रही कैदी आणि इतर गुन्ह्यांसाठी शिक्षा झालेले कैदी या प्रवचनांच्या रविवारच्या सभेत उपस्थित असत. त्यांमध्ये शेठ जमनालाल वजाज, गुलजारीलाल नंदा, अण्णासाहेब दास्ताने, साने गुरुजी इ. मंडळी उपस्थित असत.

वैयक्तिक सत्याग्रहानंतर ७ मार्च १९५१ पर्यंत पवनार येथील परंधाम आश्रमातच विनोबांनी शारीरिक आणि मानसिक तपश्चर्येत जीवन व्यतीत केले. १९३६ पासून म. गांधी साबरमतीचा आश्रम सोडून सेवाग्रामला म्हणजे पवनारजवळच येऊन राहिले. त्यामुळे गांधी आणि विनोबा यांचा चिरकाल संवाद चालू राहिला. गांधीच्या देहान्तानंतर सर्वसेवासंघ व सर्वोदय समाज या संस्थांची स्थापना झाली. मार्च १९४८ मध्ये विनोबा दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू यांच्या विनंतीवरून गेले. भारत-पाक फाळणी झाल्यानंतर परागंदा झालेले लक्षावधी शरणार्थी (सर्व बाजूंनी जीवन उद्ध्वस्त झालेले) दिल्ली, पंजाब, राजस्थान यांमध्ये आले. त्यांना धीर देण्याकरता विनोबांना पंडितजींनी बोलावून घेतले. या दौऱ्यात सर्वधर्मसमभावाचा आदेश देऊन प्रेम आणि सद्भावना निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला.

१५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदाननेते आचार्य विनोबा भावे यांनी वयाच्या ८७ व्या वर्षी प्राणत्याग केला. त्यांच्या निधनाची वार्ता त्यांनी प्रायोपवेशन सुरू केल्यानंतर केव्हाही अपेक्षित होती. ५ नोव्हेंबर रोजी विनोबांना ताप आला, त्याबरोबरच हृदयविकारही उद्भवला आणि प्रकृती चिंताजनक झाली. उपचार त्वरित सुरू झाले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचार करण्याकरता नेण्याचा विचार तज्ज्ञ डॉक्टरांनी विनोबांना सांगितला; परंतु त्यांनी परंधाम आश्रम सोडण्यास नकार दिला व तेथेच उपचार सुरू झाले. मुंबई येथील जसलोक हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉ. मेहता मुंबईहून आले. हळूहळू प्रकृती सुधारेल अशी आशा उत्पन्न झाली. अॅलोपथीचे उपचारही विनोबांनी स्वीकारले, परंतु ८ नोव्हेंबर रोजी रात्री अन्नपाणी आणि औषधे या तिन्ही गोष्टी घेण्यास त्यांनी नकार दिला. आचार्यांचे बंधू शिवाजीराव भावे, मित्र दादा धर्माधिकारी इत्यादी मंडळींनी व आश्रमस्थ भक्तजनांनी आचार्यांना परोपरीने काकुळतीस येऊन, अन्नपाणी व औषधे घेण्याची विनंती केली. ती त्यांनी नाकारली. इंदिरा गांधी विनोबाजींना १० नोव्हेंबर रोजी भेटल्या. अन्नपाणी, औषधे घेण्याची विनंती त्यांनीही केली. प्रायोपवेशनाचा संकल्प करण्याचे कारण आचार्यांनी त्र्यं. गो. देशमुख व इतर भक्तांना स्पष्ट करून सांगितले. ते म्हणाले- 'आता देह आत्म्याला साथ देत नाही. रखडत जगण्यात अर्थ नाही. जराजर्जर शरीर टाकणेच ठीक!' १५ नोव्हेंबर १९८२ रोजी आचार्य विनोबा भावे यांचे पवनार, महाराष्ट्र येथे निधन झाले.

# इडा पिडा रोगराई घेऊन जा गे मारबत..

## मारबतचा शहरात जयघोष





प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**अकोला :** मारबत उत्सव म्हणजे नागपूरची शान लाभलेला. मारबत उत्सव गेल्या १३७ वर्षांपासूनच नागपुरात अविरत साजरा करण्यात येतो. बैल-पोळ्याच्या म्हणजेच मोठ्या पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी तान्ह्या पोळ्याला मारबत बडग्याची मिरवणूक नागपुरात काढली जाते.

या अभिनव प्रथेच्या माध्यमातून वर्षभर देशात घडलेल्या चांगल्या वाईट घटनांवर भाष्य करणारे बडगे (मोठे पुतळे) तयार केले जातात. हे मारबत पाहण्यासाठी लोक नागपुरात मोठी गर्दी करतात. नागपूर प्रमाणेच अकोला शहरातही उमरी परिसरात दरवर्षी पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत काढली जाते. यंदाही परिसरातील नागरिकांनी मार्फत काढीत शहरातील रोगराई, ईडा पीडा, खासी खोकला तसेच महापालिकेतील भ्रष्टाचार घेऊन जागे मारबत चा जय घोष केला. ढोल ताशे लावीत त्या मार्फत ची मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने परिसरातील नागरिक सहभागी झाले होते अनेकांनी ही सजवलेली मारबत आपल्या खांद्यावर घेत नृत्य केले. नंतर या मारबत चे शहराच्या वेशी बाहेर दहन करण्यात आले. या आधी जुने शहर परिसरातील हरिहर पेठ परिसरातून सुद्धा तेथील हलबा कोष्टी बांधवांतर्फे मारबत चे आयोजन केले जात असे परंतु कालांतराने हे आयोजन बंद झाले परंतु उमरी परिसरातील नागरिकांनी आजही मारबत ची परंपरा जीवित ठेवली आहे

# गणेशोत्सवात पारंपारिक ढोल,ताशा आणि झांजचा वापर करा - निखीलेश दिवेकर

## अकोला जिल्ह्यात डीजेला बंदी घालण्याचे पोलीस विभागाला निवेदन



प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**अकोला:** गणेशोत्सव मंडळांनी ढोल, ताशा, झांज इत्यादी वाद्यांचा उपयोग करण्यास प्रोत्साहन द्यावे. तसेच अकोला जिल्ह्यात डीजे बंदी करावी अशी मागणी माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांनी केली आहे. पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात त्यांनी चंद्रपूर पोलिसांचा दाखला देत ही मागणी केली आहे. अकोला-गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात डीजेच्या दणदणाटाने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. शहरात सणासुदीत आवाजाची पातळी जी ६० डेसिबल पर्यंत परवानगी असते, ती उत्सवा दरम्यान १०५ ते १२० डेसिबल पर्यंत जाते. घरासमोर डीजे आल्यास काचेच्या खिडक्या अक्षरशः हादरतात व लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक तथा रुग्ण यांना खूप त्रास सहन करावा लागतो. या कारणास्तव शहरात डीजे व लेझर लाइट्स यांना पूर्णतः बंदी घालावी अशी मागणी माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांनी एका निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना केली आहे.

डीजे लावण्या ऐवजी महाराष्ट्रातील पारंपरिक वाद्ये जसे ढोल, ताशा, झांज, संबळ इत्यादी वांद्यांचा वापर करावा असे आवाहन देखील दिवेकर यांनी गणेशोत्सव मंडळांना केले आहे. यामुळे महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा तर जपण्यास मदत होईलच व नागरिकांना देखील या वाद्यांचा त्रास होणार नाही. याचबरोबर चंद्रपूर जिल्ह्यातिल पोलिसांनी डीजेला संपूर्णतः बंदी केली आहे, असा दाखला सुद्धा पोलीस अधीक्षक यांना देण्यात आला. सदर निवेदन देण्याकरिता ओंकार वानखडे, महादेव मेहंगे, बंटी खंडारे, विठ्ठल नाकट, प्रवीण बचे, धनंजय उजाडे व विनोद भिसे उपस्थित होते.

# काटेपूर्णा जलाशयाची पातळी घटतेय पण अकोल्यातील रस्त्यावर साचले तळे

प्रतिनिधी ११ सप्टेंबर



**अकोला:** जिल्ह्यात पाणी टंचाई पाहता पाण्याची बचत आवश्यक आहे. परंतु मोठ्या उमरीतील विठ्ठल नगर गल्ली क्रमांक तीन मध्ये पाण्याचे तळे साचलेले दिसते. एकीकडे शहराला पाणीपुरवठा करणा-या काटेपूर्णा जलाशयाची पातळी दिवसेंदिवस घटत आहे. सध्याच्या तापमानामुळे बाष्पीभवन झपाट्याने होत आहे. अशा वेळी पाणी वाचवले नाही तर समस्या गंभीर झाल्याशिवाय राहणार नाही

अकोल्याच्या मोठ्या उमरीतील विठ्ठल नगर गल्ली नंबर तीन मध्ये नळाचे पाणी रस्त्यावर साचून तळे निर्माण झाले. लोकांना येणे जाणे अशक्य झाले आहे. पाण्याचा अपव्यय कशा प्रकारे सुरू आहे हे दिसून येते. या भागातील नगरसेवकांनी तक्रार देखील केली परंतु महापालिका जलप्रदाय विभाग याकडे लक्ष देत नाही असा नागरिकांचा आरोप आहे. काटेपूर्णा जलाशयातील साठा अकोला शहरासाठी राखीव केला आहे. आणि अशा प्रकारे नासाडी सुरूच राहिली तर जल संकट अधिक भीषण झाल्याशिवाय राहणार नाही.

# नाईक होमिओपॅथीमध्ये असाध्य आजारांवर उपचार

## रुग्णांना उपचाराने आराम पडल्याचा दावा

प्रतिनिधी ११ सप्टेंबर




**अकोला:** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. माझे नाव स्नेहा, नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर मला थायरॉईडचा त्रास होता. माझे टिसीएच खुप वाढले होते. केस गळायचे, तनाव, चिंता खुप असायची, नाईक होमिओपॅथी मध्ये उपचार घेतला असता तिन महिन्यात मला खुप फायदा झाला. तनाव, चिंता खुपच कमी झाली. केस गळण्याचे तर पुर्णतः थांबले नाईक होमिओपॅथी उपचाराने मी १०० टक्के समाधानी आहे.

# 9 वर्षे रखडलेला ROB आता निर्णायक वळणावर....!

प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**अकोला:** शहरातील न्यू तापडिया नगर, गेट क्र. ३८ येथील रेल्वे उड्डाणपूल ९ वर्षांपासून रखडलेला असून, या प्रकल्पाचा प्रश्न आता अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. पुलाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले असतानाही उर्वरित काम निधी, रेल्वेच्या प्रलंबित बाबी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे प्रशासनातील समन्वयाच्या प्रश्नामुळे रखडले आहे.

या पार्श्वभूमीवशर १७ सप्टेंबर रोजी नागपूर खंडपीठात दाखल याचिकेच्या अनुषंगाने रेल्वे विभाग भूमिका स्पष्ट करणार आहे. त्यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रेल्वे प्रशासनाने तातडीने ताळमेळ साधून एकसंध, वस्तुनिष्ठ व सुसंगत भूमिका निश्चित करणे आवश्यक आहे, अशी मागणी नगरसेवक तथा गटनेता निलेश देव यांनी केली आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी निलेश देव यांनी २ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन दिले होते. ROB प्रकल्पाच्या रखडलेल्या कामाबरोबरच निधी, रेल्वेची प्रलंबित कामे, न्यायालयीन प्रक्रिया आणि दोन्ही विभागांमध्ये समन्वयाचा अभाव या बाबी निदर्शनास आणून देण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता १७ सप्टेंबर रोजी होणारी सुनावणी महत्त्वाची ठरू शकते असे निलेश देव यांनी म्हटले आहे.

# भारत विद्यालयात हस्तशिल्प कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी ११ सप्टेंबर



**अकोला:** वस्त्रोद्योग मंत्रालय भारत सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या हस्तशिल्प विभागांतर्गत हस्तकला प्रात्यक्षिक व जनजागृती कार्यक्रम या उपक्रमाचे आयोजन स्थानिक भारत विद्यालय येथे दिनांक 7 सप्टेंबर ते 10 सप्टेंबर या दरम्यान करण्यात आले. भारतीय हस्त शिल्पकला या संदर्भात विद्यार्थ्यांना जागृत करणे व त्या त्या विषयातील तज्ञांच्या मार्फत विद्यार्थ्यांकडून त्या कलाकृतींची निर्मिती करून घेणे हा या उपक्रमा मागचा उद्देश आहे. जेणेकरून भारतात वर्षानुवर्षांपासून अस्तित्वात असलेल्या लोककला, शिल्पकला, हस्तकला या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचाव्यात व त्या कलाप्रकारात काम करणाऱ्या कलावंतांची निर्मिती व्हावी. या विभागातर्फे संपूर्ण भारतभरात विविध शहरांमध्ये व ग्रामीण भागात वेगवेगळ्या क्षेत्रातील कलावंतांद्वारे अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते.

भारत विद्यालय येथे झालेल्या या शिबिरात वारली चित्रकला, लिंपन आर्ट, विणकाम व ढोकरा आर्ट यांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये मध्यप्रदेशातील ढोकरा आर्ट कलावंत हिरेन्द्र ध्रुवे, स्थानिक वारली आर्ट कलावंत सौ. गंधाली घोंगडे, लीप्पन आर्ट कलावंत सौ. ज्योती सोलकर व विणकाम कलावंत मधुलिका थोंबे यांनी प्रशिक्षण दिले. यांच्या मार्गदर्शना अंतर्गत भारत विद्यालय मधील विद्यार्थ्यांनी अवघ्या दोन दिवसाच्या कालावधीत उत्तम कलाकृती साकारल्या.

## कारागृहातील न्यायाधीन बंदीचा उपचारादरम्यान मृत्यू

**अमरावती :** अमरावती मध्यवर्ती कारागृहात न्यायाधीन बंदी म्हणून दाखल असलेल्या आदिल नजीर कुरेशी (वय ३८ वर्षे) यांचा दिनांक 9सप्टेंबर रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय,येथे उपचार दरम्यान मृत्यू झाला. आदिल नजीर कुरेशी याच्या विरुद्ध मुंबई सांताक्रुझ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलें होते. बंदीला दिनांक २९ जुलै २०२६ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले होते.सदर बंदीला मागील सुमारे चार वर्षांपासून ब्रेन ट्यूमर चा आजार असल्याने कारागृह प्रशासनामार्फत आवश्यक वैद्यकीय उपचार व देखरेख सुरू होती.

# आमदार रणधीर सावरकर यांनी गावाच्या ओढीने साजरा केला पोळा

प्रतिनिधी ११ सप्टेंबर



**अकोला.** शहरात वास्तव्य असले तरी आपल्या गावाची ओढ. शेती, ग्रामीण जीवन सतत साद घालत असते. आमदार रणधीर सावरकर यांनी देखील काल पळसोबढे येथे कुटुंबासह पोळा साजरा केला. सवड काढून शेतात फेरफटका मारला. पिकाची पाहणी केली. आई, वडील आणि संपूर्ण कुटुंबासह सण साजरा करण्याची मजा असते. आणि बैल पोळा म्हणजे ग्रामीण संस्कृतीची खास ओळख. बैलांना सजवणे, पुरणपोळी, ठोंबरा खाऊ घालणे अगदी आत्मियतेने केले जाते. गावात आनंदी वातावरण होते. सध्या पाऊस नाही परंतु उद्याच्या आशेने सण साजरा केला जातो. पळसोबढे धोत्रे, सावरकर यांचे गाव. भाजप नेत्या सौ. सुहासिनीताई धोत्रे, सौ. मंजुषाताई सावरकर यांनी देखील शेतात राबणाऱ्या वृषभ राजाला पुरणपोळीचा घास भरवला. त्यांचे मनोभावे औक्षण केले. संपूर्ण कुटुंबासह पोळा साजरा केला. सायंकाळी गावात पोळा भरला तेव्हा आमदार रणधीर सावरकर यांनी बैलजोडींना पुरणपोळीचा घास भरवला. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे भाव होते. आपल्या गावातील पोळा साजरा करून सर्व जण कर्मभूमी कडे रवाना झाले.

# आर.डी.जी. स्कूलने पटकावली फिरती ढाल

## 'आर.डी.जी.' स्कूलमध्ये आंतरशालेय इंग्रजी वादविवाद स्पर्धा

प्रतिनिधी ११ सप्टेंबर






**अकोला:**विद्यार्थ्यांच्या विचारांना आणि तर्कशक्तीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये आंतरशालेय इंग्रजी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचा विषय" द वॉइस ऑफ यूथ हॅज द एबिलिटी टू ब्रिंग अबाउट पावरफुल चेंजेस इन गवर्नेंस ऑफ कंट्री" हा होता.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे संचालक दिलीपराजजी गोयनका व सौ. सुनयनाजी गोयनका उपस्थित होत्या. प्राचार्य कुरियचन सी.पी., उपप्राचार्या श्रीमती श्वेता चोमवाल, भारतीय सेवा सदनच्या सदस्या व शिक्षिका इंदुबाला चौधरी, मुख्य समन्वयक गुरनीत कौर ओबेरॉय, स्कूल ऑफ स्कॉलर्सचे प्राचार्य डॉ. अतुल तसेच एकेडमिक हाइट्स पब्लिक स्कूल, मूर्तिजापूरचे प्राचार्य एम. प्रशांत कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेचे परीक्षक म्हणून अधिवक्ता श्रीमती मनीषा धूत आणि माउंट कार्मेलच्या सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती वर्जिनिया अमेयर यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्रमुख अतिथी श्री. दिलीपराजजी गोयनका यांनी आपल्या प्रेरणादायी विचारांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांचा आत्मविश्वास वाढविला. त्यानंतर चिट ड्रॉच्या माध्यमातून सहभागी शाळांमधील विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्यासाठी क्रमांक देण्यात आले. सूत्रसंचालकांनी स्पर्धेचे नियम स्पष्ट केल्यानंतर वादविवाद स्पर्धेला सुरुवात झाली.या स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी तर्कशक्तीचा वापर करत विषयाच्या बाजूने तसेच विरोधात आपले विचार उत्कृष्टपणे मांडले. स्पर्धेचे आयोजन तीन फेऱ्यांमध्ये करण्यात आले होते.

आंतरशालेय स्पर्धेत कोठारी कॉन्व्हेंट स्कूल, प्रभात किड्स स्कूल, नोएल स्कूल, श्री समर्थ पब्लिक स्कूल, आर.डी.जी. पब्लिक स्कूल, एमराल्ड हाइट्स पब्लिक स्कूल, मूर्तिजापूर, पोदार इंटरनॅशनल स्कूल, जवाहर नवोदय विद्यालय, जुबली इंग्लिश हायस्कूल आणि स्कूल ऑफ स्कॉलर्स अशा एकूण दहा शाळांनी सहभाग घेतला. स्पर्धेत आर.डी.जी. पब्लिक स्कूलच्या अनन्या देशमुख आणि नोएल स्कूलची विद्यार्थिनी सांची सुरवाडे दोघींनी समान अंक प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या संस्कृती खैरे हिने मिळविला, तर तृतीय क्रमांक प्रभात किड्स स्कूलच्या वत्सल देहानकर याने मिळविला.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना प्रमाणपत्रासह एकतिसशे रोख, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास प्रमाणपत्रासह एकवीसशे रोख, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास प्रमाणपत्रासह अकराशे रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच रोलिंग ट्रॉफी म्हणजेच फिरती ढाल आर.डी.जी. पब्लिक स्कूलने आपल्या नावावर केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील विद्यार्थीनी स्वस्ति जैन आणि शौर्य चिमनकार यांनी केले, तर इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी देवश्री गोमासे हिने आभार मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या इंग्रजी विभागातील शिक्षक-शिक्षिकांनी परिश्रम घेतले.

# श्री समर्थ कॉलेज ऑफ फिजिओथेरेपीला मान्यता

## 60 विद्यार्थ्यांच्या प्रवेशक्षमतेसह बीपीटीएच अभ्यासक्रमाला परवानगी

प्रतिनिधी ११ सप्टेंबर

**अकोला :** श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, अकोला संचलित श्री समर्थ कॉलेज ऑफ फिजिओथेरेपी, अन्नपूर्णा माता मंदिरासमोर, रिधोरा (ता. बाळापूर) येथे भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम (BPTh) सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून ६० विद्यार्थ्यांच्या प्रवेशक्षमतेसह हा अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने ३१ ऑगस्ट २०२६ रोजी शासन निर्णय जारी केला आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून प्राप्त प्रस्ताव, विद्यापीठाची शिफारस तसेच वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या सक्षमता तपासणीच्या अहवालाच्या आधारे शासनाने ही मान्यता दिली आहे. संबंधित संस्थेच्या भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला परवानगी देण्याची शिफारस वैद्यकीय शिक्षण आयुक्तांनी केली होती. दरम्यान, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून श्री समर्थ कॉलेज ऑफ फिजिओथेरेपीला शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी फर्स्ट टाइम ॲफिलिएशन (प्रथम संलग्नता) ९ सप्टेंबर २०२६ रोजी प्राप्त झाले आहे. त्यामुळे अकोला शहरासह जिल्ह्यातील आणि परिसरातील विद्यार्थ्यांना फिजिओथेरेपी पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण स्थानिक पातळीवर घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

### अत्याधुनिक उपकरणांसह रुग्णसेवेला बळकटी

धावपळीच्या जीवनशैलीमुळे विविध शारीरिक व्याधींचे प्रमाण वाढत असताना फिजिओथेरेपीचे महत्त्वही वाढले आहे. हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांसह विविध आजार व दुखापतींनंतरच्या पुनर्वसनात फिजिओथेरेपीची महत्त्वपूर्ण भूमिका असते. अशा परिस्थितीत अकोला शहर व परिसरात फिजिओथेरेपी शिक्षण आणि रुग्णसेवेचे एक नवे दालन उपलब्ध झाले आहे.

अत्याधुनिक उपकरणांच्या माध्यमातून रुग्णसेवेला अधिक बळकटी देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. शहरापासून जवळच्या परिसरातच हा अभ्यासक्रम उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही फिजिओथेरेपी क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी मिळणार आहे. शासनाची मान्यता आणि विद्यापीठाची संलग्नता मिळाल्याने संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे, असे संस्थेचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे यांनी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## सावधान...
### दुध जन्य पदार्थ निकृष्ट आरोग्याशी खेळ उत्कृष्ट




## वाशीमच्या 'एफडीए' मध्ये वसुलीचा माऊली...

# पैशाची सावली, 'रेणूका' पावली !

* मुंढे साहेब तुमच्या नावाच्या धाकावर वसुलीतून अधिकारी 'मालामाल'.
* कारवाई तिन महिन्यापुर्वी थेट, प्रसिद्धीपत्रक हेतूपुरस्कर लेट.
* एफडीए विभागातील अधिकाऱ्यांना सुगीचे दिवस.



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे दबंग सनदी अधिकारी म्हणून ख्याती असलेले तुकाराम मुंढे यांनी स्वीकारल्यानंतर राज्यातील भेसळ करणाऱ्या विविध व्यावसायिकांसह त्यांच्या पाठीराख्या पुढाऱ्यांच्या हृदयात धडकी भरली आहे.निर्भिड अधिकारी असलेले या विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्रातील जनतेला विषमूक्त अन्न उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात ज्या दिवसापासून या विभागाची सूत्रे स्वीकारलीत त्या दिवसापासून कारवाईची मालिका सुरू केली आहे.त्यामुळे मुंढेसाहेबांच्या या निर्णयाचे विविध स्तरातून अभिनंदन केल्या जात आहे.

परंतु वाशीम जिल्ह्याचा 'या' विभागाचा कारभार अफलातून असून वाशीमच्या एफडीए विभागाने प्रसारमाध्यमांना दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात ज्या पाच व्यावसायिकांच्या व्यापारी प्रतिष्ठानात अप्रमाणित दुग्धजन्य पदार्थ सापडलेत त्यापैकी प्रसिद्धीपत्रकात फक्त चौघांची नावे प्रसिद्ध करून एका अप्रमाणित पदार्थाची विक्री करणाऱ्या व्यावसायिकाचे नाव जाहीर न केल्याने वाशीमच्या एफडीए च्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झावे आहे.तर दुसरीकडे जून महिन्यात केलेल्या कारवाईची माहिती प्रसारमाध्यमांना सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात म्हणजेच तिन महिन्यांनी देण्याचा अफलातून प्रकारही उघडकीस आला आहे.ज्या पाच व्यावसायिकांच्या दुग्धजन्य पदार्थामध्ये अप्रमाणित घटक आढळलेत त्यापैकी 'रेणूका' एफडीए च्या अधिकाऱ्यांना 'पावली' असल्याची जिल्हाभरात चर्चा आहे. या संशयास्पद भूमिकेमुळे वाशीमचा अन्न व औषध प्रशासन विभाग मुंढे साहेबांच्या डोळ्यात खटकल्याची चर्चा आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाला मागील वर्षापर्यंत पांढरा हत्ती म्हणून संबोधित होते. राज्यात दबंग सनदी अधिकारी म्हणून ख्याती असलेले तुकाराम मुंढे यांची राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी मे २०२६ मध्ये नियुक्ती झाल्यानंतर 'या' विभागाचा कायापालट झाला.जे अधिकारी, कर्मचारी पुर्वी भेसळखोरी करणाऱ्यांपासून हप्ते वसूल करून मालामाल बनलेत. आता त्याच अधिकाऱ्यांना अनेकवर्षापासून लागेबांधे असलेल्या भेसळखोरांच्या पदार्थांची तपासणी करण्याची वेळ आल्याचे वास्तव आहे. वाशीच्या एफडीए विभागाने जून २०२६ ते ऑगष्ट २०२६ या तिन महिन्यात एकूण ३३ प्रतिष्ठानातील दुग्धजन्य पदार्थांची तपासणी केली. त्यापैकी पाच व्यावसायिकांच्या व्यापारी प्रतिष्ठानातील दुग्धजन्य पदार्थामध्ये अप्रमाणित घटक असल्याचा या विभागाला अहवाल प्राप्त झाला आहे.त्या पाच प्रतिष्ठानाची नावे प्रसिद्ध करतांना एफडीएच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी 'एका' प्रतिष्ठाणाला डावलून फक्त चार प्रतिष्ठानाची नावे प्रसिद्धीपत्रकात देवून स्वत:चा उदउदो करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्या पाच पैकी एका प्रतिष्ठानावर या' विभागाची कृपादृष्टी असल्याची आणि वाशीमच्या एफडीए विभागाला 'रेणूका' पावल्याची जिल्हाभरात चर्चा आहे. या अफलातून कारभाराची मुंढे साहेबांकडे काही जागरूक नागरिकांनी सविस्तर माहिती पाठवल्याची चर्चा आहे.

## थोडक्यात

### शिक्षक मतदार संघाची उपेंद्र पाटील अपक्ष निवडणूक लढणार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



येत्या नोव्हेंबर महिन्यात अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक होणार आहे.या निवडणुकीत अनेक उमेदवार इच्छुक आहेत.सर्वांनी आपापल्या परीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे.त्यामध्ये कायम विना अनुदानित शाळा कृती समितीचे अमरावती विभागीय संघटक उपेंद्र बाबाराव पाटील हे अपक्ष उमेदवार म्हणून या वेळी या निवडणुकीत आपले भाग्य आजमावणार आहेत. माधवराव पाटील विद्यालय कार्ली येथे अंशतः अनुदानित शाळेवर ते मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.१९९९ मध्ये स्थापन झालेल्या या कायम विना अनुदानित शाळेवर काम करायला त्यांनी सुरुवात केली.काही वर्षानंतर २००९ मध्ये कायम शब्द निघाल्याने २० टक्के अनुदान आले.आता या शाळेला ८० टक्के अनुदान आहे.गेल्या २५ वर्षा पासून १०० टक्के अनुदानाची प्रतिक्षा ते आणि त्यांचे राज्यातील हजारो सहकारी करीत आहेत.आपली उमेदवारी का? अंशतः अनुदानित शाळांना १०० टक्के वाढीव टप्पा अनुदान मिळावे, जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, विना अनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षकांना अनुदानित शिक्षका प्रमाणे सर्व लाभ मिळावे, अंशतःअनुदानित शाळा वरून सेवा निवृत्त झालेल्या शिक्षक, कर्मचारी यांना फिक्स पेन्शन द्यावे, ग्रामीण भागातील शाळांना बंद होण्यापासून रोखण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरणे, समान काम समान वेतन आणि सेवा सुरक्षा देणे, टीइटी ऐवजी शिक्षकांच्या अनुभव व गुणवत्तेला प्राधान्य देणे, ग्रामीण भागातील शाळा सक्षम करून मराठी शाळा बंद होण्यापासून वाचविणे.

### प्लॉटच्या वादातून धमकी व बदनामी केल्याचा आरोप

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

प्लॉटच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादातून शिवीगाळ, धमकी तसेच वर्तमानपत्रातून बदनामी केल्याचा आरोप करीत अनिल तुकाराम चावुकस्वार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे. संबंधित गैरअर्जदारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून संरक्षण देण्याची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे.

तक्रारीनुसार, तक्रारदार हे वाशिम येथील आर.ए.वाय.यू.डी.पी. कॉलनी परिसरात राहतात व मजुरीचे काम करतात. गैरअर्जदारांमध्ये लक्ष्मण प्रल्हाद वानखेडे, गणेश मोहळे व उमेश मोहळे यांचा समावेश आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, १४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेनऊ ते साडेदहा वाजताच्या सुमारास शेलू रोडवरील हॅप्पी फेसेस शाळेसमोर ते क्रिकेट खेळत असताना काही जणांनी त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली तसेच धमकी दिली. यावेळी 'तू लई माजला आहेस, तुला माहिती आहे काय?' अशा शब्दांत धमकावल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारदाराने या घटनेची माहिती देण्यासाठी वाशिम शहर पोलीस ठाण्यात गेल्याचेही निवेदनात म्हटले आहे. त्यानंतर गैरअर्जदारांकडून आपल्याला शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आर्थिक त्रास देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच २५ ऑगस्ट २०२६ रोजी एका वर्तमानपत्रात आपल्या नावाची बदनामी करण्याच्या उद्देशाने बातमी प्रसिद्ध करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, प्लॉटच्या व्यवहारावरूनही वाद असल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. संबंधित गैरअर्जदारांनी आपल्याकडून प्लॉट विक्रीचा व्यवहार केल्यानंतर त्याचा ताबा दिला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पैसे मागितल्यास उलट धमकी दिल्याचेही निवेदनात नमूद आहे. या व्यवहारासंदर्भात दिवाणी न्यायालयात दावा दाखल केल्याचे तक्रारदाराने सांगितले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित गैरअर्जदारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी तसेच आपल्याला संरक्षण मिळावे, अशी मागणी अनिल चावुकस्वार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. निवेदनाच्या प्रती उपविभागीय पोलीस अधिकारी व वाशिम शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांकडेही देण्यात आल्या आहेत.

## वाशीम न.प.च्या जन्म - मृत्यू विभागात...

# सफाई कामगार पहातात कारभार; मुख्याधिकाऱ्यांकडे नगरसवेकाची तक्रार !

*दोन ते तीन महिने उलटूनही दाखल्यांसाठी चकरा मारावे लागत आहे
*मुख्याधिकाऱ्यांनी जन्म मृत्यू विभागाकडे लक्ष द्यावे अशी मागणी नगरसेवक शेख रशीद (नूर) यांनी केली आहे

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशीम नगर परिषदे मध्ये मागील काही महिन्यांपासून जन्म मृत्यू दाखले घेण्यासाठी नागरिकांना चकरा मारावे लागत आहे. अर्ज देऊनही दोन ते तीन महिने उलटूनही दाखले दिले जात नसल्याचा आरोप नागरिक करीत आहे.विशेष म्हणजे या विभागात सफाई कामगार संगणक चालवित असून जबाबदार लिपिक यांना संगणक येत नसल्याने ते केवळ कुर्सीवर बसून राहत आहे. न.प.च्या या कारभाराला सर्व सामान्य नागरिक त्रस्त झाले असून सफाई कामगारांना आणि संबंधित लिपिक यांना हटवून सक्षम अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी नगरसेवक शेख रशीद ( नूर )यांनी केली आहे.








नगरसेवक शेख नूर शेख शहानुर यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, वाशिम नगर परिषदेमधील जन्म-मृत्यू नोंदणी विभागात काही गंभीर अनियमितता होत असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली आहे. सफाई कामगार पदावर नियुक्त असलेले कर्मचारी प्रत्यक्षात जन्म-मृत्यू नोंदणीसंबंधीचे कार्यालयीन व संगणकीय कामकाज करत असल्याचे दिसून येत असून, त्यांच्याकडून अशा प्रकारची कामे कोणत्या आदेशानुसार करून घेतली जात आहेत, याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.तसेच, या विभागात कामासाठी येणाऱ्या नागरिकांकडून संबंधित कर्मचाऱ्यांच्या उद्धट वागणुकीबाबत, अरेरावीबाबत आणि समाधानकारक सेवा मिळत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होत असून यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, या विभागात कार्यरत संबंधित लिपिकांकडे आवश्यक संगणकीय ज्ञान नसल्याचे दिसून येत असून, त्यांच्याकडे शासनाने विहित केलेली एमएस-सीआयटी अथवा समकक्ष संगणक पात्रता आहे की नाही, याची सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.असेल तर संबंधित लिपिक संगणकाची कामे का करत नाही असा सवाल नगरसेवकाने केला आहे.

जन्म-मृत्यू विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा विभाग असल्याने तेथील कामकाज पात्र कर्मचाऱ्यांकडून होणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागात कार्यरत सफाई कामगारांच्या नियुक्ती व कामकाजाची चौकशी करून त्यांना त्यांच्या मूळ पदाच्या जबाबदाऱ्यांनुसार काम देण्यात यावे. तसेच, लिपिकांची शैक्षणिक व संगणकीय पात्रता तपासून अनधिकृतपणे इतर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. जन्म-मृत्यू विभागात सक्षम पात्र अधिकारी-कर्मचारी नियुक्त करून नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नगरसेवक शेख रशीद(नूर) शेख शहानुर यांनी वाशिम न.प. मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## पावडे यांच्या विश्वास ढलने नहीं दूँगा काव्यसंग्रहाचे प्रकाशन थाटात !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •




कवी तथा साहित्यिक धिरज बालासाहेब पावडे लिखित 'विश्वास ढलने नहीं दूँगा' या हिंदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन वाशिम येथे साहित्यप्रेमी व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात थाटात संपन्न झाले. अद्वैत प्रकाशन, दिल्ली यांच्यातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन विदर्भ साहित्य संघ, शाखा वाशिम व सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम यांच्या वतीने करण्यात आले होते.

एस.एम.सी. शिक्षण संकुल परिसरात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. श्री. हरिभाऊ धीरसागर, अध्यक्ष, एस.एम.सी. शिक्षण प्रसारक मंडळ, वाशिम हे होते. प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. किरणराव सरनाईक, शिक्षक आमदार, अमरावती विभाग, तसेच मा. श्री. बाबारावजी मुसळे, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, शाखा वाशिम आणि प्रसिद्ध कवी मा. गजानन फुसे उपस्थित होते. कार्यक्रमात सहभागी कवींनीही आपल्या कविता सादर करून साहित्यिक वातावरण अधिक रंगतदार केले. मोहन शिरसाट, गजानन शिले, भारत लाडे, वैभव भिवरकर, डॉ. विजय काळे, गजानन कदम, धिरज पावडे, अनिकेत देशमुख, गजानन चौधरी, पल्लवी आंबकार, माधुरी बहादुरे, ज्योती देशमुख, अविनाश परासकर, गोपाल खाडे व प्रा. सुनीता अवचार आदी सहभागी कवींनी आपल्या रचना सादर केल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चाफेश्वर गंगडे व उमेश बोराटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विदर्भ साहित्य संघ, शाखा वाशिम व सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम यांनी परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय ओपन कराटे स्पर्धेत वाशीमचा दबदबा !

### निखिल देशमुख शोतोकान कराटे ॲकॅदमीला 'बेस्ट टीम' ट्रॉफी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय ओपन कराटे स्पर्धेत वाशीम येथील निखिल सरांच्या शोतोकान कराटे अकादमीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत वाशीमच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत अकादमीचे एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

त्यापैकी ३३ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक, ४ विद्यार्थ्यांनी रौप्यपदक तर ३ विद्यार्थ्यांनी कांस्यपदक पटकावले.एकूण ४० पैकी तब्बल ३३ सुवर्णपदके मिळवत वाशीमच्या शोतोकान कराटे अकादमीने स्पर्धेत सर्वाधिक सुवर्णपदके जिंकणारी टीम ठरवण्याचा मान मिळविला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ॲकॅदमीला स्पर्धेतील क्रमांक एकची 'बेस्ट टीम ट्रॉफी' प्रदान करण्यात आली.स्पर्धेदरम्यान प्रमुख पाहुणे ङनांदेडचे आमदार बालाजी कल्याणकर तसेच लोकनेत्या प्रणिता देवरे-चिखलीकरङ यांनी वाशीमच्या विद्यार्थ्यांचे कराटे सामने प्रत्यक्ष पाहिले. विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तंत्रशुद्ध कामगिरी, आत्मविश्वास आणि आक्रमक खेळ पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांचे प्रशिक्षक शिहान निखिल अनिल देशमुख यांचे विशेष कौतुक केले.या सर्व विद्यार्थ्यांना शिहान निखिल अनिल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे कराटेचे प्रशिक्षण दिले जात आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित होणाऱ्या कराटे स्पर्धांमध्ये सातत्याने सहभागी होत असून, आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या माध्यमातून वाशीम जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल करत आहेत.स्पर्धांमधील सातत्यपूर्ण यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता आणि नेतृत्वगुण निर्माण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालकांकडूनही त्यांचे कौतुक होत असून, अकादमीच्या प्रशिक्षण पद्धतीचे आणि शिहान निखिल देशमुख यांच्या मार्गदर्शनाचे अभिनंदन केले जात आहे.

# रिक्त पदे तातडीने भरा; रोजगार महाकुंभाचा युवकांना लाभ द्या -जिल्हाधिकारी

### जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती तसेच जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समितीची संयुक्त बैठक

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •




जिल्ह्यातील विविध शासकीय व खासगी आस्थापनांवरील रिक्त पदे अधिसूचित करून तातडीने भरण्याची कार्यवाही करावी. तसेच जिल्ह्यातील उद्योजक व आस्थापनांनी त्यांच्या रिक्त पदांची पूर्तता रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून करावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामार्फत दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण राज्यात 'रोजगार महाकुंभ' अंतर्गत रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत वाशिम जिल्ह्यात एकूण १० ठिकाणी रोजगार मेळावेज आयोजित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर रोजगार मेळाव्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती तसेच जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समितीची संयुक्त बैठक घेतली.यावेळी ते बोलत होते. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्यावतीने सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे तसेच कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी वैशाली पवार उपस्थित होत्या. तसेच संबंधित समित्यांचे सदस्य उपस्थित होते. जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीचे सदस्य तसेच जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समितीच्या सदस्यांनी रोजगार मेळाव्याच्या आयोजनासंदर्भात विविध सूचना व अभिप्राय मांडले. यावेळी रोजगार मेळाव्याच्या तयारीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील रोजगार मेळावे यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

## निवडणूक विभागाच्या कारभाराबाबत मतदारांच्या तक्रारी- सुनिल मालपाणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (SIR) प्रक्रियेदरम्यान मंगरुळपीर तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाच्या कामकाजाबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. SIR प्रक्रियेत ज्यांचे नाव आढळत नाही, अशा मतदारांना आवश्यक माहिती व सहकार्य मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी भाजपाचे सुनील मालपाणी यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, याबाबत चौकशी करण्यासाठी तहसील कार्यालयात गेलेल्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन करण्याऐवजी बाहेर जाण्यास सांगितले जाते. तसेच 'सर्व्हर डाऊन आहे, बीएलओंना भेटा,' असे सांगितले जाते. मात्र, कार्यालयात बीएलओ उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे तक्रारदारांनी सांगितले. काही नागरिकांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.या तक्रारींची दखल घेत सुनील मालपाणी यांनी तहसील कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरिकांच्या समस्येबाबत विचारणा केली. मतदार यादीत नाव नसलेल्या किंवा SIR प्रक्रियेत अडचणी येत असलेल्या नागरिकांना कर्मचाऱ्यांनी आवश्यक ते सहकार्य व मार्गदर्शन करावे, अशी मागणी त्यांनी केली. नागरिकांना सहकार्य न केल्यास या प्रकरणाची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात येईल, असा इशारा सुनील मालपाणी यांनी दिला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135